## सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद नंदुरबार

### कनिष्ठ प्रशासन अधिकारी या पदोन्नती संवर्गासाठी दि.०२/०८/२०२४ रोजी विचार क्षेत्रातील कर्मचाऱ्यांच्या जेष्ठता यादी प्रसिध्द करण्यात येऊन दि.०८/०८/२०२४ पर्यंत मागविण्यात आलेल्या आक्षेप व हरकतींच्या निराकरणाबाबत

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांचे नाव, पदनाम व कार्यरत ठिकाण | आक्षेप / हरकतीचे संक्षिप्त विवरण | हरकती निराकरणाबाबत केलेली कार्यवाही |
|---|---|---|---|
| १ | श्री.एन.टी.धनगर, वरिष्ठ सहाय्यक, पंचायत समिती शहादा | कनिष्ठ प्रशासन अधिकारी संवर्गात पदोन्नती देणेकामी विचार क्षेत्रातील कर्मचाऱ्यांच्या यादीत माझे नाव अ.क्र.३९ वर दर्शविण्यात आले आहे. सदर यादीत माझा मूळ नेमणूकीच्या दिनांकात दिनांक ०१/०४/१९९९ दर्शविलेला असून, प्रत्यक्षात माझा मूळ नेमणूकीचा आदेशाचा दिनांक २८/०३/१९९९ असा आहे त्यामध्ये बदल करण्यात यावा. तसेस मी दिनांक ०२/०३/२००९ च्या आदेशान्वये वरिष्ठ सहाय्यक या पदावर मला पदोन्नती मिळाली आहे. परंतु माझ्या पेक्षा नंतर पदोन्नती मिळालेले वरिष्ठ सहाय्यक यांना यादीमध्ये माझ्यापेक्षा पुढे दर्शविण्यात आले आहे. तरी माझ्या पेक्षा कनिष्ठ असलेल्या वरिष्ठ सहाय्यक यांचे नावापुढे माझे नाव दर्शवून जेष्ठता सूचीत जेष्ठते प्रमाणे बदल करण्यात यावा. | सदर यादीत आपल्या नेमणूकीच्या दिनांकात २८/०३/१९९९ असा बदल करण्यात आला आहे. मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्र.२७९७/२०१५ या प्रकरणी दि.०४/०८/२०१७ रोजी दिलेल्या निर्णयान्वये पदोन्नतीतील आरक्षण अवैध ठरविले असल्याने व मा.सर्वोच्च न्यायालयाने मा.उच्च न्यायालयाच्या या निर्णयास अद्याप स्थगिती दिलेली नसल्याने पदोन्नतीच्या कोट्यातील सर्व रिक्त पदे दि.२५/०५/२००४ च्या स्थितीनुसार सेवा जेष्ठतेने भरण्याबाबत धोरण निश्चित केल्याने सामान्य प्रशासन विभागाकडील दि.०७/०५/२०२१ च्या शासन निर्णयात नमुद अ.क्र.३ चा (अ) व (ब) नुसार कनिष्ठ प्रशासन अधिकारी संवर्गात पदोन्नतीसाठी विचार क्षेत्रातील कर्मचाऱ्यांची यादी शासनाकडील प्राप्त शासन निर्णयातील निर्देशानुसार तयार करण्यात आली असुन कनिष्ठ सहायक संवर्गाची सन २००४ ची सेवाजेष्ठता यादीनुसार आपले स्थान उचित आहे. |

Signed by Pandurang Sakharam Kolhe
Date: 24-08-2024 16:31:45

उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.)
जिल्हा परिषद नंदुरबार